"A" Re-accredited by NAAC(2014) With CGPA-3.16

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR 416,004 MAHARASHTRA**
PHONE :EPABX-2609000 GRAM : UNISHIVAJI
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर — ४१६ ००४ महाराष्ट्र
तार : युनिशिवाजी ( राष्ट्रीय सेवा योजना )
Registrar's Office Fax – 0091-231-2692333,C.O.E. Office Fax - 0091-231-2690655
F & A. O. Office Fax - 0091-231-2693201, Phone No.- 0231-2609066
web site : www.unishivaji.ac.in.

शिवाजी वि/रासेयो/जन.वर्क्स./लेखा/ 26 दिनांक :–०९–०५–२०१६

प्रति,

मा. प्राचार्य,

विषय:– सन २०१५–२०१६ या आर्थिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर या दोन्ही योजनांचे केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी करणेसाठी संबधित सर्व कागदपत्रासह प्रतिनिधी पाठविणेबाबत....

संदर्भ:– या कार्यालयाचे पत्र क्र. शिवाजी वि/रासेयो विभाग यांचे दि.२८/०४/२०१६ चे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात आदेशान्वये कळविणेत येते की, सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयाचे सन २०१५–२०१६ या आर्थिक वर्षातील राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम व विशेष शिबिर या दोन्ही योजनांची केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी कोल्हापूर जिल्हा दि १६/०५/२०१६ व १९/०५/२०१६, सांगली जिल्हा दि १७/०५/२०१६ व २०/०५/२०१६ व सातारा जिल्हा दि. १८/०५/२०१६ व २१/०५/२०१६ या तारखेस शिवाजी विद्यापीठ कार्यालयातील कक्ष क्र.२०५ (मुख्य इमारत) या ठिकाणी सकाळी १० त ५ या वेळेत होणार आहे. तरी आपल्या महाविद्यालयाने सदर योजना राबविल्या असल्यास यापूर्वी कळविलेप्रमाणे आपल्या महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजना हिशेबा संदर्भातील रोजकिर्द, खतावणी , मुळ व्हौचर्स, खर्चाचे आडवे फॉर्मस्, मुळ हजेरी पत्रक, स्टॉक रजिस्टर, बॅक पासबुक, अनुदान मंजूरीचे पत्रा, अ व ब फॉर्म व या संदर्भातील सर्व कागदपत्रे दोन्ही योजनांची केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणी करणेसाठी सोबत आणावीत. तसेच महाविद्यालयांनी लेखा परीक्षणास येताना गतवर्षीचे सन २०१४–१५ या आर्थिक वर्षाचे लेखा परीक्षीत स्टेटमेंट, व लेखा परीक्षकांच्या सहीसाठी आरंभीची शिल्लक व अखेरची शिल्लक दर्शविणारे जमा व खर्चाचे स्टेटमेंट व विनियोग प्रमाणपत्रा तीन ( ३ ) प्रतीत भरून प्राचार्य व कार्यक्रम अधिकारी यांच्या सहीनिशी सोबत आणावीत . तसेच या आर्थिक वर्षामध्ये दोन्ही योजनांसाठी ७०% : अनुदानाची रक्कम यापूर्वी दिली आहे. तेंव्हा ही रक्कम जमा बाजूस व विनियोग प्रमाणपत्रामध्ये न चुकता दाखविण्यात यावी, व हिशेब सादर करताना १००% : खर्चाचा हिशेब सादर करावा.

लेखा परीक्षणासाठी राष्ट्रीय सेवा योजना हिशेबा संदर्भात संपूर्ण माहिती असणारा एकच प्रतिनिधी पाठवावा. दोन्ही योजनांची केंद्रीय पध्दतीने लेखा परीक्षण करणेसाठी विद्यापीठाचे सनदी लेखा परीक्षक मा. पोवार, सामंत आणि जाधव, कोल्हापूर यांना प्रत्येक महाविद्यालयाने रू. ४५६/– लेखा परीक्षण शुल्क रोखीने द्यावे. या लेखा परीक्षणशुल्काची पावती प्रत्येक महाविद्यालयास प्रत्यक्ष लेखा परीक्षण होवून लेखे सही झालेनंतर ज्या त्या वेळी दिली जाईल. या केंद्रीय पध्दतीने हिशेब तपासणीबाबत विद्यापीठाचे सनदी लेखा परीक्षक मा. पोवार, सामंत आणि जाधव, कोल्हापूर यांचेशी आपल्या महाविद्यालयास संपर्क साधावयाचा झालेस त्यांचा पूर्ण पत्ता व फोन नंबर नमूद केला आहे.

शासन निर्णय क्र. रासेयो २०१५/प्र.क्र. ७१/१५/साशि – ७ दि. ३०/०६/२०१५ व समन्वयक रासेयो यांचे पत्र क्र. शिवाजी वि/रासेयो दि. २८/०४/२०१६ च्या पत्रान्वये रासेयो योजने अंतर्गत स्वयंसेवकाची सन २०१५–१६ या वर्षातील प्रत्यक्ष प्रवेशित विद्यार्थी संख्या प्रवर्गनिहाय ( **SC / ST**) एकूण मंजूर विद्यार्थी संख्येनुसार **SC-12 %** व **ST-5 %** व इतर **83-%** याप्रमाणे नियमित कार्यक्रमासाठी विद्यार्थी संख्या असणे अनिवार्य आहे. प्रवर्ग निहाय विद्यार्थ्यांची माहिती सोबत जोडलेल्या तक्ता " क " नुसार सादर करणे आवश्यक आहे त्याशिवाय लेखा परिक्षण केले जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

तरी आपण आपल्या महाविद्यालयाचे लेखा परीक्षण नमूद केलेल्या तारखेस, दिलेल्या वेळी व ठिकाणी लेखा परीक्षण करून घेणे आपल्यावर बंधनकारक आहे..

तरी कृपया, लेखा परीक्षण झालेनंतर १) जमा व खर्चाचे स्टेटमेंट व विनियोग प्रमाणपत्राची एक प्रत २) खर्चाचे आडवे फॉर्म ३) रू.१०००/— वरील खर्चाच्या व्हौचर्सची प्रमाणित झेरॉक्स प्रत ४) कोटेशन्स तुलनात्मक तक्ता व ऑर्डर पत्रा ५) कामाचे मुळ दाखले ६) अहवाल व मुळ हजेरीपत्राक ७) बातमीची झेरॉक्स ८) तक्ता "क" नुसार प्रवर्गनिहाय माहिती व विद्यार्थी यादी. ९) यापूर्वी पाठविलेला अ व ब फॉर्म यासह विद्यापीठास दोन्ही योजनांचे वेगवेगळे हिशेब सत्वर सादर करावेत, ही विनंती.

आपला विश्वासू ,

उपकुलसचिव
(लेखा विभाग)

लेखा परीक्षक यांचा संपर्कासाठी पत्ता व फोन नं. :—
मा. पोवार, सामंत आणि जाधव, कोल्हापूर
१८८८ ई वॉर्ड ओमेगा टॉवर २०४,
राजारामपुरी ९ वी गल्ली कोल्हापूर. पिन कोड— ४१६ ००८.
फोन नं. ऑफीस (०२३१) २५२९६८५, २५२०५७६.

तक्ता "क"

शासन निर्णय क्र. रासेयो २०१५/ प्र.क्र. ७१/१५ / साशि – ७ उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय कक्ष, एल्फिस्टन तंत्राविद्यालय परीसर, मुंबई दि. ३० जून, २०१५ नुसार सन २०१५–१६ या वर्षासाठी रासेयो महाविद्यालय प्रवर्गनिहाय नियमित कार्यक्रमात सहभागी विद्यार्थ्यांची माहिती.

१) महाविद्यालयाचे नांव :–

२) नियमित कार्यक्रम मंजूर विद्यार्थी संख्या :–

३) सन २०१५ – २०१६

| अ.क्र. | विद्यार्थ्यांचे पूर्ण नांव | वर्ग | रोल नंबर | SC 12 % | ST 5 % | General 83 % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | |
| २ | | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| ५ | | | | | | |
| | | एकूण – | | | | |

सही

कार्यक्रम अधिकारी

सही

प्राचार्य

---

शासन निर्णयानुसार महाविद्यालयातील रासेयो नियमित कार्यक्रमासाठी प्रवर्गनिहाय मंजूर विद्यार्थी संख्येची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| मंजूर विद्यार्थी संख्या | अनुसूचित जाती SC 12 % | अनुसूचित जमाती ST 5 % | इतर General 83 % | एकूण |
|---|---|---|---|---|
| ५० | ०६ | ०३ | ४१ | ५० |
| १०० | १२ | ०५ | ८३ | १०० |
| १५० | १८ | ०७ | १२५ | १५० |
| २०० | २४ | १० | १६६ | २०० |
| २५० | ३० | १२ | २०८ | २५० |

वरीलप्रमाणे नियमित कार्यक्रमासाठी एस्.सी. व एस्.टी प्रवर्गासाठी मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा प्रत्यक्ष सहभागी विद्यार्थी कमी असल्यास प्रती विद्यार्थी रू. २१०/– याप्रमाणे अनुदान कपात केले जाईल तसेच तक्ता " क " प्रमाणे माहिती दिल्याशिवाय लेखा परिक्षण केले जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.